महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
दूरध्वनी क्र. (०२२) २२८४ ५२३०
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, ३ रा मजला, दालन क्र.३५७,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

क्रमांक: टिईएल-१०२४/प्र.क्र.४३/प्रशासन-५ दिनांक : १० जुलै, २०२५.

प्रति,

संचालक (माहिती तंत्रज्ञान),
सामान्य प्रशासन विभाग,
७ वा मजला, विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई.४०००३२

विषय -वित्त विभाग, मंत्रालय येथील सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी स्मृतिचिन्ह देण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, वित्त विभागातील सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना स्मृतिचिन्हे देण्यात येतात. दरवर्षी साधारणपणे २० ते २५ अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होत असतात. सबब, त्यांना देण्यासाठी जुलै, २०२५ ते जून २०२६ या कालावधीत २० ते २५ स्मृतिचिन्हांची आवश्यकता आहे.

२. तरी सदर स्मृतिचिन्हांचा पुरवठा करण्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबतची जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची असून सदर निविदा जाहिरात दि.१०/०७/२०२५ रोजी प्रकाशित करावी, ही विनंती. सोबत निविदा जाहिरातीचा मजकूर जोडला आहे.

( राजेश गावडे )
कक्ष अधिकारी, वित्त विभाग

सोबत :- सहपत्र.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
दूरध्वनी क्र. (०२२) २२८४ ५२३०
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, ३ रा मजला, दालन क्र.३५७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

क्रमांक: संकीर्ण-१०२५/प्र.क्र.२२/प्रशासन-५ दिनांक : १० जुलै, २०२५.

## निविदा सूचना

वित्त विभागातील सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना स्मृतिचिन्हे देण्यात येतात. सबब, सदर स्मृतिचिन्हांचा पुरवठा करण्यासाठी खाली नमूद अटी व शर्तीनुसार मोहोरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत-:

१. प्रत्येक व्यावसायिक पुरवठादारास फक्त एक दरपत्रक सादर करता येईल.

२. पुरवठादाराने त्यांचा GST क्रमांक असलेल्या छापील लेटर हेडवरच दरपत्रक सादर करणे अनिवार्य आहे.

३. स्मृतिचिन्ह सोबत जोडलेल्या छायाचित्राप्रमाणे असणे आवश्यक आहे.

४. विभागाची गैरसोय न होता जेव्हा स्मृतिचिन्हे मागविण्यात येतील त्यावेळी विहित कालावधीत स्मृतिचिन्हांचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

५. सदर निविदेतील दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन वित्त विभागात स्मृतिचिन्हांचा पुरवठा करण्याबाबतची दरपत्रके इच्छूक स्थानिक पुरवठादार संस्थेने त्यांचा GST क्रमांक, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, इ. असलेल्या छापील लेटर हेडवर उपरोक्त सर्व अटी मान्य असल्याचे पुरवठादाराची स्वाक्षरी व रबरी शिक्क्यासह **दि.१०/०७/२०२५ ते १७/०७/२०२५ या कालावधीत दुपारी ३.०० वाजेपर्यंत** मोहोरबंद लिफाफ्यात कक्ष अधिकारी (प्रशासन-५), वित्त विभाग, रुम. नं. ३५७ (विस्तार), ३ रा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -४०००३२ यांच्या नावे पाठवावेत. त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

६. सदर निविदा दि.१७/०७/२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता उघडण्यात येतील. मोहोरबंद लिफाफे उघडते वेळी निविदाधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

७. निविदाकाराने स्मृतिचिन्हाचा नमुना सोबत सादर करावा. (सदर नमुना परत करण्यात येईल)

८. मोहोरबंद लिफाफ्यावर "वित्त विभागात स्मृतिचिन्हांचा पुरवठा करण्याबाबत" असे लिहिणे आवश्यक आहे.

९. पुरवठादाराकडे व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध नोंदण्या करण्यात आल्याच्या प्रमाणपत्रांची छायांकित प्रत सोबत असणे आवश्यक आहे. उदा - दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत प्रमाणपत्र/प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैधतेची मुदत इत्यादी पुरवठादाराच्या नावे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडण्यात यावी.

वरील सर्व अटी व शर्ती विचारात घेऊन वित्त विभागास आवश्यक असणाऱ्या स्मृतिचिन्हांचा (सोबतच्या छायाचित्राप्रमाणे) पुरवठा करण्याबाबतची दरपत्रके दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात कक्ष अधिकारी, (प्रशासन-५), दालन क्रमांक ३५७, तिसरा मजला, वित्त विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२ यांचे नावे पाठवाव्यात.

(राजेश गावडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क. (०२२) २२८४ ५२३०

वित्त विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, ३ रा मजला, दालन क्र.३५७,
मंत्रालय मुंबई-४०००३२.

क्रमांक: संकीर्ण-१०२५/प्र.क्र.२२/प्रशासन-५ दिनांक : जुलै, २०२५.

## वित्त विभागातील सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या स्मृतिचिन्हांचा पुरवठा करण्याबाबत

भाग १ : तांत्रिक (प्रपत्र-अ)

| | | |
|---|---|---|
| | निविदाधारकाचे/पुरवठादाराचे /संस्थेचे नाव | |
| १ | कार्यालयाचा संपूर्ण पत्ता (पुरावा सोबत जोडण्यात यावा). महानगरपालिकाचे कर भरणा देयक किंवा विद्युत भरणा देयकांची छायांकित प्रत. | |
| २ | दूरध्वनी (कार्यालय) | |
| ३ | मोबाईल क्रमांक | |
| ४ | ई-मेल:- | |
| ५ | आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) पुरवठादाराच्या /संस्थाच्या नावावर असणे आवश्यक आहे. त्याची छायांकित प्रत जोडावी | |
| ६ | वस्तू व सेवा कर ( GST ) प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी . | |
| ७ | व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणा-या विविध नोंदण्या:- उदा: दुकाने व संस्था अधिनियम १९४८:- प्रमाणपत्राची छायांकित प्रत सोबत जोडण्यात यावी. | |
| ८ | निविदा सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत पुरवठादाराच्या छापील लेटरहेडवर (ज्यावर GST क्रमांक नोंदविण्यात आलेला आहे) स्वाक्षरी व रबरी शिक्का असणे आवश्यक आहे. | |

दिनांक :-

स्थळ :

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

(सूचना : दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, गिरवणे (ओव्हररायटिंग), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत).

C:\Users\...\Desktop\Ramesh Gawade\स्मृतिचिन्ह.docx

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,

दूरध्वनी क्र. (०२२) २२८४ ५२३०

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
विस्तार इमारत, ३ रा मजला, दालन क्र.३५७,
मंत्रालय मुंबई-४०००३२.

क्रमांकः टिईएल-१०२४/प्र.क्र.४३/प्रशासन-५

दिनांक : जुलै, २०२५.

## वित्त विभागातील सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या स्मृतिचिन्हांचा पुरवठा करण्याबाबत

भाग १ : तांत्रिक (प्रपत्र-ब)

१. पुरवठादाराचे पूर्ण नाव :-------------------------------------------------------------
२. पत्रव्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------------------------------
३. दूरध्वनी क्रमांक:-अ) कार्यालय:--------------------------------------------------
ब) मोबाईल :-------------------------------------------------------------
४. E-mail Address: ---------------------------------------------------------------

| अ क्र | विवरण | प्रती नग किमंत (रु.) |
|---|---|---|
| १ | वित्त विभागातील सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या स्मृतिचिन्हांचा पुरवठा करण्याबाबत | |

दिनांक :-
स्थळ : -

निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

(टिप : पुरवठादाराने उपरोक्त प्रपत्रात माहिती सादर करावी अन्यथा ग्राहय धरण्यात येणार नाही. दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटिंग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. निविदा कोणत्याही टप्प्यावर निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत).

C:\Users\jayshree.dudwadkar\Desktop\Rajesh Gawade\सन्मानचिन्ह.docx


HD
14:05